सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड.

दुरध्वनी क्रं. 02462-234255/फॅक्स क्र 02462-235103
E mail Id--lcb.nanded@gmail.

स्थानिक गुन्हे शाखा, तळ मजला खोली क्रं.11
पोलीस अधीक्षक नांदेड वजिराबाद -431601

**Press Note** दिनांक 08/08/2025

# "नांदेड पोलीसांची 2024-2025 मध्ये MPDA ची 2+ स्कीम अंतर्गत 32 वी कारवाई"

| पोलीस ठाणे | प्रस्ताव पाठविणारे अधिकारी |
|---|---|
| शिवाजीनगर, नांदेड. | श्री. राजेश पुरी, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड. |

**स्थानबध्द करण्यासाठी कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार**

मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक साहेब, नांदेड
मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर
मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड
**यांचे मार्गदर्शनाखाली**
श्री. सुशिलकुमार नायक, उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग इतवारा, नांदेड.
श्री. उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड.
श्री.राजेश पुरी, पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड.
श्री. नरसिंह अनलदास, सहा. पोलीस निरीक्षक, प्रतिबंधक सेल, नांदेड.
श्री उमेश कदम, पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड.
पोहेकॉ/उमेश आकोसकर, पोहकॉ/अनिल झांबरे, पोहेकॉ/मन्मसिंह कांबळे, पोकॉ/लिंबाजी राठोड, अंकुश लंगोटे, बालाजी यादगीरवाड, संजय यमल्लवाड, ओमप्रकाश कवडे,

**स्थानबद्ध करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव**

**संतोष ऊर्फ चिंग्या पि. साईनाथ तरटे वय 24 वर्षे व्यवसाय बेकार रा. खोब्रागडे नगर, नांदेड**

## हकीकत

**मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांनी नांदेड शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सूव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नांदेड जिल्हयातील गुन्हे अभिलेखावरील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणारे सराईत आरोपीची यादी **2+ स्किम अंतर्गत** तयार करुन, आरोपी विरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंबंधाने सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. नांदेड जिल्हयातील गुन्हेगांरावर वारंवार प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन देखील त्यांचे वर्तणात सुधारणा होत नसल्याने नांदेड जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेदाराकडुन सराईत गुन्हेगाराना स्थानबध्द करण्यासंबंधाने MPDA प्रस्तावाची कार्यवाही चालु आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये शांतता व सूव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, MPDA अंतर्गत सन 2024 मध्ये एकुण 13 रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगाराना कारागृहामध्ये **"स्थानबध्द"** करण्यात आले असून सन 2025 या चालू वर्षामध्ये 19 सराईत गुन्हेगारास कारागृहामध्ये "स्थानबध्द" करण्यात आले आहे. त्याचबरोबर मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी सन 2024-2025 मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 55 प्रमाणे एकुण 76 गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन 2025 मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 56 प्रमाणे एकुण 21 गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. सर्व सामान्य, शांतता प्रिय नागरीकांना त्रास देणारे उपद्रवी गुन्हेगारांवर पोलीसांची करडी नजर असून अशा गुन्हेगारांवर **"स्थानबध्द"** सारखी कठोर कार्यवाही करण्यात येत आहे.

सराईत गुन्हेगार **नामे, संतोष ऊर्फ चिंग्या पि. साईनाथ तरटे वय 24 वर्षे व्यवसाय बेकार रा. खोब्रागडे नगर, नांदेड.यांचे विरुध्द खून, खूनाचा प्रयत्न, अग्नीशस्त्र ताब्यात बाळगणे, खंडणी वसूल करणे, शस्त्र ताब्यात बाळगणे,** करणे असे गंभिर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याने श्री राजेश पुरी, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड यांनी, नमुद गुन्हेगारास MPDA अधिनियमा प्रमाणे **स्थानबध्द** करणे बाबतचा प्रस्ताव मा. पोलीस अधीक्षक, साहेब नांदेड यांचेकडे सादर करण्यात आला होता. प्रस्तावामध्ये काही उणीवा राहणार नाहीत या करीता श्री उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड यांनी महत्वपुर्ण कामकाज पाहीले आहे. नांदेड जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत सराईत पणे गुन्हे करणारे 150 पेक्षा अधिक गुन्हेगारांचे गुन्हेगारी रेकॉर्ड प्रमाणे त्यांच्यावर विविध कायद्याअंतर्गत योग्य ती प्रतिबंधात्मक कार्यवाही प्रस्तावीत आहे.

**मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांनी सदर MPDA प्रस्तावामधील गुन्हेगारांना एक वर्षाकरीता स्थानबध्द करण्याबाबतची शिफारस मा. जिल्हादंडाधिकारी, नांदेड यांचेकडे केली होती. त्यावरुन **मा. श्री. राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड** यांनी सदर प्रस्तावातील गुन्हेगारास एक वर्षाकरीता मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे MPDA कायद्याअंतर्गत स्थानबध्द करण्याबाबतचे दिनांक 08/08/2025 रोजी आदेश पारीत केले आहेत. गुन्हेगारांना ताब्यात घेवून कारागृहामध्ये बंद करण्यात येत आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड.**